


## ह्या वीडियोमध्ये तुम्ही शिकणार की कपडाच्या कडेला रोल्ड हँग किंवा पीको नी कसे फिनीश करायचा




तुम्हाला लागणार एक लांब जीर जीर कपडाचा तुकडा. जोर्गेट किंवा सिल्कचा तुकडा पण चालेल. रोल्ड हॅमिंग फुट जो मशीन च्या आक्सेसरी किटस च्या सोबत येतो.


आता बघुया की पिको फीट कसा लावायचा ? बॅलेन्स वील स्वता:जवळ फिरवून सुईला सर्वात वर ढकला. क्लँप फिट लिवर उचलून फूट ए काढा.

आता पिको फुट खाली ठेवून फुट क्लँप लीवेर खाली ढकला म्हणजे फुट त्याला जोडले जाईल. स्टिच पॅटर्न सेलेक्टर ला सी वर आणि स्टिच लेंथ ला दोन वर ठेवा.

या सेट्टिंग ने तुम्हाला अतिशय बारीक हिम शिवून मिळणार. आता कापड ठेवून त्याला उल्टा ठेवा. कोपरा घेऊन प्रेसर फुट खाली सरळ ठेवा.

मशीन सुरू करून पुढे काही टाके घ्या. प्रेसर फुट वर उचलून बॉबिन आणि सुई चा धागा बाहेर खेचा. लांबून धागा कापा म्हणजे हेममिंग करताना तो धरता येईल.

आता धागा परत पिको फीट खाली घ्या आणि कपडाला रोल फुट नि वळवा. हे केल्यानंतर लीवर दाबून फुट कपडावर आणा.



अतिरिक्त धागा प्रेसर फुट खाली सरकावा आणि सावकाश शिवलेल कपडाला कल करून घ्या, धाग्याने खेचा.

मशीन हळूवार पाने चालवा म्हणजे कापड बरोबर पिको फुट मध्ये जाईल आणि कर्ल होईल. कापड सम प्रमाणात कल होतय याची काळजी घ्या. रोल्ड हेमम शिवताना हळूहळू मशीनचा वेग वाढवा.

एक सारखी शिवन येण्यासाठी कपडाला सावकाशपणे पुढे ढकला. म्हणजे ते बोटातून सुरळितपणे मशीनमध्ये खेचला जाईल. जेव्हा तुम्ही एका बाजूच्या शेवटला याल तेव्हा फुट उचला आणि जरा लांबून धागा कापा.



म्हणजे तुम्ही कपडाची दुसरी बाजू पिको फुट मधून काढू शकाल.
या पद्धतीने कपडाची इतर बाजू शिवा आणि धागे कापून टाका.

ही पद्धत इतर मेटीरियल्स वर प्रॅक्टिस करा, म्हणजे तुमचा हात बसेल.
असे केल्याने तुम्ही भविष्यात जे काही कालाविष्कार कराल त्याची फीनीश साफ आणि उत्तम होईल.